॥श्री॥

# मोडक कुलसंमेलन सन २०१५ वृत्तांत

दिनांक २ व ३ मे रोजी सप्तेश्वर मंदिर पंचनदी ता.दापोली येथे डोंबिवलीच्या सुहास यशवंत,सचिन शरद, राजीव विश्वनाथ,विघ्नराजेंद्र मधुसूदन,तसेच पंचनदीच्या सुनील भार्गव,सुहास भास्कर,सुहास शिवराम,श्रीनिवास यशवंत आणि पंचनदीकर ग्रामस्थ यांच्या अथक परिश्रमाने आयोजित केलेल्या संमेलनास २२५ मोडक कुलबंधू/भगिनी उपस्थित होते.महाराष्ट्रातून तसेच इंदूर,भोपाळ, अशा दूरच्या ठिकाणाहून येवून मोडक मंडळी पंचनदी सारख्या छोट्याशा गावातील घराघरातून केलेल्या व्यवस्थेमध्ये कुटुंबातील व्यक्तीप्रमाणे आनंदाने राहिली.

दि.२ मे रोजी दुपारी ४ ते ५ या वेळात अल्पोपहार व नोंदणी झाल्यावर कॅप्टन सिताराम गोपाळ यांना अध्यक्ष व डॉ.शंकर केशव यांना प्रमुख पाहुणे/वक्ते म्हणून नियुक्त केले. त्यांच्या हस्ते परशुराम पूजन व दीप प्रज्वलन करून संमेलनाचे उद्घाटन झाले. कुलन्यासाचे अध्यक्ष श्री श्रीधर वामन यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात अशा संमेलनांची आवश्यकता अधोरेखित करून या पूर्वीच्या संमेलनांचा आढावा घेतला कुलन्यासाच्या कार्याची आणि प्राथमिकतेने हाती घेतलेल्या कुलवृत्तान्ताच्या प्रगतीची माहिती दिली व त्यासाठी आर्थिक मदतीचे आवाहन केले.

प्रमुख वक्ते डॉ. शंकर केशव यांनी भावी काळातील संक्रमण शक्यता (फ्युचरॉलॉजी) ही संकल्पना विषद करून भावी काळातील आव्हाने,उपलब्ध संधी यांचा उहापोह केला आणि तरुणांना त्या विषयी मार्गदर्शन केले.

श्री हेमंत अरुण व मंदार मनोहर यांनी तयार केलेल्या मोडक कुलन्यासाच्या वेब साईटचे व कुलवृत्तांत संगणकीकरणाचे प्रोजेक्टरच्या साहय्याने सादरीकरण श्री हेमंत अरुण यांनी केले. उपस्थितांच्या सर्व शंकांचे निरसन करून वेब साईट सर्वांना पाहण्यासाठी खुली केल्याचे जाहीर केले.

कॅप्टन सिताराम गोपाळ, श्री कृष्णाजी अनंत, श्री मोहन अच्युत, सौ. पौर्णिमा विनायक आणि सौ. मीरा प्रसाद या मोडक कुलातील विशेष कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. सन मार्च २०१४ मधील १० वी व १२ वी च्या परीक्षेत कुलातील ९० टक्क्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या चि.स्वराज दत्तात्रय (चिपळूण) व चि.योगेश सुधीर(शिमोगा)यांना रोख पारितोषिके जाहीर करण्यात आली. नंतर उपस्थितांनी घराणे निहाय परस्पर परिचय करून घेतला. घराणे निहाय ग्रुप फोटो काढण्यात आले. तसेच माहेरवाशिणींचा सत्कार करण्यात आला.

भोजनोत्तर विविध गुणदर्शनाचे कार्यक्रमात दूरदर्शन अभिनेत्री सौ.मीरा प्रसाद यांनी विनोदी कार्यक्रम सादर केला. सौ. पौर्णिमा विनायक यांनी सुश्राव्य गायन सादर केल्यावर प्रथम दिवसाची कार्यक्रम समाप्ती झाली.

दि.३ मे रोजी सकाळी सर्वांनी कोळथरे येथील स्वच्छ व सुंदर समुद्र किनाऱ्यावर मनमुराद आनंद लुटला.नंतर कुल दैवत श्री कोळेश्वराचे दर्शन घेऊन सर्वजण संमेलनास उपस्थित झाले. चहा फराळानंतरचे सत्रात सुरवातीस सौ. नामजोशी यांनी नामस्मरणाचे महात्म्याबाबत कीर्तन सादर केले.उपस्थितांच्या विनंतीवरून कोषाध्यक्ष श्री अरविंद वामन यांनी न्यासाच्या विविध तरतुदी विषयी माहिती दिली व सन २०१४ -१५ मधील जमाखर्चाचे वाचन करून त्यास मान्यता घेतली.

नंतर उपस्थितांनी गावनिहाय एकत्र येऊन परस्पर परिचय व चर्चा केली. व त्यातील प्रतिनिधींनी चर्चेचे निष्कर्ष व निर्णय सर्वांपुढे मांडले.श्री संजय हेमंत यांनी कुलवृत्तांतासाठी प्रत्येक घराण्यातील लोकांनी एकत्रितपणे किमान रू. दहा हजार निधी गोळा करून द्यावा म्हणजे कुलवृत्तांताचे काम लवकर मार्गी लागेल अशी सूचना करून घराणे क्र.८ तर्फे ते हे काम हाती घेतील असे सांगितले. श्री मिलिंद अरविंद यांनी मोडक कुलातील व्यावसायिक बंधु/भगिनी यांनी एकत्र येऊन एकमेकांना सहाय्य करण्यासाठी काही कार्यक्रम हाती घ्यावयाचा असेल तर त्यांच्याशी संपर्क करण्यास सुचविले. या नंतर सूत्र संचालक सौ. वीणा अरविंद यांनी संमेलन यशस्वी करण्यासाठी मदत केलेल्या सर्वांचे विशेषत पंचनदीकर ग्रामस्थांचे आभार मानले.सुग्रास भोजना नंतर संमेलनाची सांगता झाली.